विंधण विहिर व वायु संपिडक सुरुंग
कार्यक्रमाचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण
कार्यक्रम अंमलबजावणीची कार्यपध्दती
विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :ग्रापापु-२००१/ प्र.क्र. २५० / पापु- ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ मार्च, २००१**

**वाचा :** शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रं. ग्रापापु १०००/
प्र.क्र. १०७ (५)/ पापु-०७ दि. १४ नोव्हेंबर, २०००.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाकडील रु.७५ लाख पर्यंतच्या स्वतंत्र गावच्या पाणी पुरवठा योजना, विंधण विहिर कार्यक्रम व वायु संपिडक सुरुग योजना हे कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे राबविण्यासाठी सोपविण्यात आले असून हे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिका-यांची पदस्थापना जिल्हा परिषदेकडे करण्यात आली असून वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांना जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे. हे कार्यक्रम राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना संदर्भीय शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

२. विंधण विहिर व वायु संपिडक सुरुंग कार्यक्रमाचे जिल्हा परिषदांकडे हस्तांतरण करण्यात आल्यानंतर हे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीचे वाटप, साहित्याची खरेदी इ. मध्ये सुसुत्रता राहावी म्हणून यासाठीची कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे:-



४०९

१) **विहिरींच्या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी** (योजनांतर्गत, स्थानिक विकास निधी मधील व टंचाई कार्यक्रम इ.) **यापुढे जिल्हा परिषदां मार्फत करण्यात यावी.** मात्र सध्या पाणी टंचाईचा कालावधी सुरु असल्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा कार्यक्रम **या वर्षाची पाणी टंचाई संपल्यानंतर म्हणजे जुलै २००१ पासून जिल्हा परिषदांकडे वर्ग करावा.**

2) विंधण विहिर कार्यक्रमासाठीचा **योजनांतर्गत निधि** सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासून जिल्हा परिषदांना अर्थोपाय आगाऊ रकमेच्या व्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल, तर टंचाई अंतर्गत इतर उपाय योजना साठीचा निधी ज्याप्रमाणे रोख रकमेच्या स्वरुपात संबंधित विभागीय आयुक्तांना देण्यात येतो, त्याच प्रमाणे टंचाई कार्यक्रमांतर्गतच्या विंधण विहिर कार्यक्रमासाठीचा निधी सुध्दा संबंधित विभागीय आयुक्तांना देण्यात यावी. व विभागीय आयुक्तांनी आवश्यकतेनुसार तो जिल्हयांना वाटावा (सध्या टंचाईचा कालावधी सुरु असल्याने टंचाई कार्यक्रमांतर्गतच्या विंधण विहिर कार्यक्रमाच्या निधीच्या वाटपाची कार्यपध्दती यावर्षीची पाणीटंचाई संपल्यानंतर म्हणजे **जुलै, २००१ नंतर अंमलात आणावी )**

3) जिल्हयातील विंधण विहिरींचा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यकतेनुसार खाजगी विंधणयंत्रे भाडयाने लावण्याचे अधिकार संदर्भिय शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांना देण्यात आले आहेत. मात्र खाजगी विंधणयंत्रांच्या विंधण कामाचे दर सध्याच्या पध्दती प्रमाणेच शासन स्तरावर निश्चित करण्यात येतील. या शासन मान्य दरानुसार राज्यामध्ये विंधण काम करण्यास तयार असलेल्या **कंत्राटदारांची नोंदणी संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी करावी,** व जिल्हा परिषदांच्या मागणी नुसार आवश्यक तेवढी विंधण यंत्रे जिल्हा परिषदांकडे पाठवावीत.

4) विंधण विहिर कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले हातपंप, जी.आय.पाईप्स व इतर साहित्याची खरेदी जिल्हा परिषदां मार्फत करण्यात यावी. तथापि अशी खरेदी **शासन स्तरावरील विभागीय भांडार खरेदी समितीने निश्चित केलेल्या दरानुसार व पुरवठादारांकडून करण्यात यावी.** पुरवठा दारांची यादी व दर संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे मार्फत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत खुल्या बाजारातून अथवा इतर मार्गाने खरेदी करु नये. अपवादात्मक परिस्थितीत अशी खरेदी करणे आवश्यक असल्यास त्यासाठी शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

5) वायू संपिडक सुरुंग योजनेसाठी लागणारा दारुगोळा, जिलेटिन, व डेटोनेटर्स सध्याच्या पध्दती प्रमाणेच संबंधित **प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा** यांनी करावी. यासाठी प्रत्येक जिल्हा



802

परिषदांनी आपली मागणी संबंधित प्रादेशिक उप संचालकांकडे नोंदवून त्यासाठी आवश्यक असलेला निधीही त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावा.

६) वायु संपिडक सुरुंग योजना कार्यान्वित करताना लाभार्थ्यांकडून प्रति सुरुंग छिद्र या प्रमाणे मिळणारा निधी यापुढे संबंधित जिल्हा परिषदांनी **जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी** व या जमा रकमेतून या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांची खरेदी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा.मंत्री (पा.पु.व.स्व.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पा.पु.व.स्व.) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
संचालक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक , भूजल सर्वेक्षणआणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
सर्व उपमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७.



803